# पक्रण ३ रे

# 'झावळं' आणि 'पखाल'

# कादंबरीच्या आशयाचे स्वरूप

# प्रकरण ३रे : 'झावळं' आणि 'पखाल' कादंबरीच्या आशयाचे स्वरूप


| अ.क्र. | घटक व उपघटक | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक | ५७ |
| २ | 'झावळं' कादंबरीच्या आशयाचे स्वरूप | ५८ ते ६५ |
| | १ .शीर्षक मुखखपृष्ठाचा समर्पक समन्वय | ५८ |
| | २ .कादंबरीची पार्श्वभूमी | ६२ |
| | ३ . कादंबरीचे वेगळेपण | ६५ |
| ३ | 'पखाल' कादंबरीच्या आशयाचे स्वरूप | ६७ ते ७७ |
| | १ .शीर्षक मुखपृष्ठाचा समर्पक समन्वय | ६७ |
| | २ .कादंबरीची पार्श्वभूमी | ७० |
| | ३ . कादंबरीचे वेगळेपण | ७७ |
| ४ | समारोप | ७८ |
| ५ | संदर्भ ग्रंथ सूची | ८० |

# प्रकरण ३रे : 'झावळं' आणि 'पखाल' कादंबरीच्या आशयाचे स्वरूप.

## १. प्रास्ताविक

मराठी वाङ्:मयात १९६० पर्यंत मर्यादित चाकोरीबद्ध जाणिवांवर पोसलेला साहित्यप्रवाह रूढ होता. मात्र त्यानंतरच्या काळात विविध साहित्यप्रवाह सामिल झाले. पूर्वीच्या साहित्यातील वाङ्:मयीन प्रतिमा किंवा संकल्पना या पांढरपेशा समाजाशी संबंधित होत्या पण दलित व ग्रामीण साहित्याची निर्मिती झाल्यानंतर पूर्वीच्या प्रतिमा व प्रतिकांमध्ये बदल झाला आणि अजूनपर्यंत जनसामान्यांना माहित नसलेले चित्रण, विविध परिस्थितीचे दर्शन प्रथमच साऱ्या मध्यमवर्गीय समाजाला घडले. मुख्य म्हणजे उपेक्षित समाज अशा साहित्यामुळे वाचकांसमोर आला. अशाप्रकारे विविध जाती-जमातींचे प्रस्थापित समाजाचे चित्र उभे करण्यात दलित साहित्य व ग्रामीण साहित्याचा मोठा वाटा आहे. जो मोठा समाज उपेक्षित आहे. ज्याला हलाखित दिवस काढावे लागले आहेत. अशा समाजाच्या दु:खामागची वेदना या साहित्यातून प्रकट झाली आहे. माणूस असुनसुध्दा माणसांसारखं जगायला मिळत नाही आणि एक माणूसच आपल्या सारखा दुसऱ्या माणसाला जगू देत नाही ही तीव्र वेदना ग्रामीण व दलित साहित्यातून प्रकर्षाने व्यक्त होऊ लागली.

दरम्यान १९६० नंतरच्या 'जगबुडी','पांगिरा,' 'बगाड,''शिढोरी',यासारख्या कादंबऱ्यांनी विज्ञान-तंत्रज्ञान आणि औद्योगिकीकरणामुळे उद्ध्वस्त झालेले विविध जाती-जमातींचे भावविश्व अचूकपणे टिपलेले आहे. उत्तम बंडू तुपे यांची 'झावळं' आणि 'बाबाराव मुसळे यांची 'पखाल' या कादंबऱ्यांनीही अशाच एका उपेक्षित कोळी समाजजीवनाचे चित्रण केलेले आहे. या कादंबऱ्या च्या आशयाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

## २ 'झावळं' कादंबरीच्या आशयाचे स्वरूप:-

'झावळं' कादंबरीच्या आशयाचा विचार करीत असताना कादंबरीच्याशीर्षक-मुखपृष्ठापासून ते अखेरचे पान महत्त्वपूर्ण ठरते. या अनुषंगानेच प्रस्तुत कादंबरीचा विषय, पार्श्वभूमी ,कथानक,पात्ररचना,वातावरणनिर्मिती, घटना-प्रसंग,निवेदन व भाषाशैली याचबरोबर कादंबरीच्या आशयाच्या बाबतीत येणारे विविध सामाजिक,धार्मिक,ऐतिहासिक,पौराणिक, राजकीय व नैतिक संदर्भासह कादंबरीच्या वेगळेपणाचा विचार करणे आवश्यक ठरते.म्हणून प्रथमत:या सर्व बाबींचा विचार करू.

## १. शीर्षक व मुखपृष्ठाचा समर्पक समन्वय

उत्तम बंडू तुपे यांनी 'झावळं' या कादंबरीचे शीर्षक व मुखपृष्ठाची योजना कादंबरीच्या कथानकाच्या आशयाशी तंतोतंत जुळणारी अशी केली असल्यामुळे 'झावळं' ही कादंबरी वाचकाला अधिकाधिक उलगडत जाताना दिसते. मुखपृष्ठ,शीर्षक आणि आशय या तिन्हींचा लेखकाला समर्पक समन्वय साधता आलेला आहे.

'झावळं' वाचल्यानंतर आपणाला असे जाणवते की,या कादंबरीतील काशिनाथचे लेखकाने निर्माण केलेले व्यक्तिचित्र हे संपूर्ण 'झावळं'शी संबंधित आहे. 'झावळं' आणि 'काशिनाथ' ह्या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तो पूर्णपणे आपल्या व्यवसायात एकरूप व समरस झालेला आहे. बिदाल या गावी धरण झाल्याने माण नदीवरील काशिनाथचं 'झावळं' कोरडं पडलं आणि काशिनाथचं सारं कुटुंब झावळ्याखाली झाकाळलं. याचा सर्व दृष्टीने विचार केल्यानंतर लेखकाने कादंबरीला दिलेले शीर्षक समर्पक व योग्यच दिले आहे असे वाटते.

'झावळं' या कादंबरीचा प्रारंभ स्वरूप व अखेरपर्यंत प्रमुख विषय

नदीलाच आपली काळी आई मानून आपलं सारं सुख-दु:ख सांगणाऱ्या कोळी जमातीवर औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या धरणाने कसा अन्याय केला आणि त्यावर अवलंबून असणारी सारी कोळी कुटुंबे कशी उद्ध्वस्त झाली. या वाताहातीचा धागा संबंध कादंबरीच्या कथानकात विणून आशय समृद्ध केला आहे. नवीन औद्योगिकीकरण,कृषी संस्कृतीचा उगम आणि मासेमारी कोळी जमातीचा त्यामुळे झालेला अस्त हाच विषय संपूर्ण कादंबरीभर यथायोग्यपणे लेखकाने चित्रीत केलेला आहे.

नदीवर मासे मारणारा कोळी हा चांगले व ज्या माशांना लोकांची आवड आहे अशे मासे मिळविण्यासाठी पाण्यामध्ये बाभळीच्या फांद्या टाकतो त्याला 'झावळं' म्हणतात. या झावळ्याचा कालावधी दोन-तीन महिने असतो. बाभळीच्याच फांद्या टाकण्याचे कारण म्हणजे बोरीच्या फांद्याप्रमाणे माशांना त्याच्या काट्यांनी इजा होत नाही. याशिवाय त्यामध्ये मातीच्या आणि पिठाच्या गोळ्याचे खाद्य टाकले असता बाभळीच्या सालीचा सुगंध पाण्यात दरवळतो व त्यामुळेच सर्व प्रकारचे (सुग्री,काटंकिंजाळ,फेक,लोळी,बारक्या,आंबळ्या,चांभार,कुत्तर, झिंग,मुगळी,कोळशा,धवर,डेंग,पहाडी,कानुशी,वाबं,मरळ,घोगरा,झिंगाडा)मांसे या झावळ्यात चरण्यासाठी येतात. याशिवाय खेकडा व कासव यांच्या मांसल भागाला बाभळीचे काटे टोचल्यास ते या झावळ्यात येत नाहीत व माशांची पिल्ले खात नाहीत. हाही प्रमुख हेतू असल्याचे जाणवते.

प्रस्तुत कादंबरीत 'झावळं' या शीर्षकाला अनुषंगून संदर्भ आलेले आहेत. 'झावळं पोटात घालणे',(पृ.११९). 'झावळं कमावणे' (पृ.११७) यासारखे वाक्यप्रचारही आलेले आहेत. माशांचा व्यापार करणारा कासेगावचा पाहुणा काशिनाथला झावळ्यात नुसतं धान्य टाकण्याची सूचना करतो तेव्हा काशिनाथ झावळ्याची रचना व खाद्य याची माहिती याप्रमाणे देतो.

"छा छा ! तुमचं चुकतंय्,पावणं. पाण्यात नुसतं धान्य टाकलं, तर राह्याचं न्हाय. सगळ्या डोहात पसरलं नि मासा झावळ्यात गुतून

राहता चरायला घावलं, तिकडं पळत सुटलं. मातीच्या गोळ्यातलं धान्य झावळ्याच्या बाहेर जायाचं न्हाय. ह्यो धान्याचा कूट, बाभळीच्या शेंगाची कूट मिसळलेलं मातीचं गोळे पाण्यात टाकलं की धान्याचा कूट पाण्यात मुरल्यागत फुगतो नि बाभळीच्या शेंगाच्या कुटाचा वास सुटतो. त्या वासानं मासा झावळ्या,खिळ्यात येतो नि खायाला घावलं की, बांधून ठेवल्यागत झावळं धरून खिळ धरून ऱ्हातो" (पृ.११८)

तसेच झावळ्यातील माशाचं येणं-जाणं जे होतं याचेही तुपेंनी चांगलं वर्णन केलेले आहे.

" तेलात भजी सोडल्यागत मातीचं गोळं झावळ्यात सोड त हुता. बाभळीच्या वासानं पाण्याच्या तळातलं मासं बोलावून आणल्यागत झावळ्यात येऊन थिर बसत हुतं. चरणी घातलेल्या शर्तीच्या बैलागत मासं झावळ्यात बसून काशिनाथनं टाकलेल्या चाऱ्यावर चरत हुतं जेवणावळीचं आवतनं दिल्यागत एकाला चार मिळून माशांचा झुंडी झावळ्या खिळ्यात आलेल्या बघून काशिनाथच्या जिवाचा डोंगर होत हुता. म्हणताना काशिनाथ खिळ्या झावळ्याच्या उसाभरीत दिवस घालवून सांजचं पेठा घिऊन नदीच्या वरच्या अंगाला पाण्यात जाळी घालत हुता. जावाय पावणा रूसुन गेल्यागत त्याचा रूसवा काढायंपुरतं मासं त्याच्या पदरात घालून त्याला बी झावळ्यातल्या माशागत गुतवून ठेवत हुता" (पृ.११८)

प्रत्येक कोळी कुटुंब हे झावळ्यालाच आपले भांडवल व उत्पन्नाचे साधन मानून आपला मासेमारीचा धंदा करीत आलेले आहे. परंतु कित्येक वेळा नदीला अवकाळी पूर येणे,खंड्या,बगळा,खेकडा,कासव,धामीन यासारखे पशु-पक्षी प्राणी तसेच संध्याकाळी झावळं लुटून नेणारे चोर अशा वैऱ्यांशी सामना करीत जीवन जगावं लागते. आणि साहजिकच भारतीय धार्मिक श्रद्धेच्या परंपरेनुसार हे कोळी कुटुंब नदीलाच 'आई 'मानतो. तसेच

महादेव,खंडोबा, म्हसोबा, मेघ,साती-आसरा, माऊलाया या पाण्यातल्या दैवदैत्यावर श्रद्धा असणे अपरिहार्यच. याबाबतीत अनेक संदर्भ कादंबरीच्या पानोपानी आपणास वाचावयास मिळतात. कादंबरीचा नायक काशिनाथ हा सुब्या जोडीदाराबरोबर झावळ्यात माशांला गेल्यानंतर पाण्यात असताना संकटात सापडतो त्यावेळी काशिनाथ म्हणतो,

> " ह्या येळंला कुणीतरी यावं, मला बळ द्यावं. ह्यो धारंतला म्हसोबा,पाण्यातल्या साती-आसरा वरचा माऊलाया व सोमनं धावक्ता वर्सातनं निवद नारळ खात्यात नि असल्या परसंगाला कुठं गप हुत्यात? या ,ऊठा ,देवांनू, मला आधार द्या. माझ धन पाण्यात चाललं, पाण्यातलं पीक पिकलंय् हाताला आल्याला शेर हाया न्हाई, तुमास्नी माझी कीव येणार न्हाय ! "(पृ.१३)

अशा श्रद्धेवर आपला धंदा अजमावत प्रत्येक कोळी कुटुंब जगत आलेले आहे. काशिनाथाला गावातली राधा ही देखील झावळ्यागत भासते. राधाच्या आत्महत्येनंतर आठवण काढताना काशिनाथ स्वत:शीच पुटपुटतो.

> "फाटकं पागिरं सांधत हुतो, तवा राधा आली हुती, भुक्या पोटी घास घालून गेली नि तीच काळाचा घास झाली. मरताना बी माझचं रगत तिच्या पोटात हुतं.तिच्यात मी हुतो.पर माझ्यात ती कवाच राहिली न्हाई झावळ्यागत मला तिनं सगळं दिलं. झावळ्यागत आपुणच इस्कटून बी गेली. राधी मोठी हुती. नदीगत हुर्द हुतं तिचं त्याचा अंत लागला न्हाई".(पृ.११२)

प्रस्तुत साऱ्या कादंबरीतूनच 'झावळं' म्हणजे नदीवरील शेती आणि त्याची मशागत करणारा शेतकरी म्हणून काशिनाथ व त्याचे कुटुंब असल्याचे सूचित होते. झावळं आणि कादंबरीचा नायक म्हणून काशिनाथ तसेच आशयात्मक कथानकाचा विचार करता सर्वांचा अन्योन्यसंबंध आहे. यामुळेच कादंबरीचे शीर्षक, मुखपृष्ठ यांचा

समन्वय उत्तम तुपेंनी योग्य पद्धतीने साधला आहे, असेच आपणाला म्हणावे लागेल.

## २. कादंबरीची पार्श्वभूमी

## १. लेखनकाल व हेतू

'झावळं' ही उत्तम बंडू तुपे यांची १९९१ साली प्रकाशित झालेलीआणि मासेमारी कोळी समाजाच्या जीवनाचे चित्रण करणारी १२८ पृष्ठांची कादंबरी आहे. सदर कादंबरीच्या निर्मितीचा हेतू स्पष्ट करताना तुपेंनी सांगितले की,'"सामाजिक उन्नती घडविताना ग्रामीण भागातील नदीच्या पाण्यावर उपजिवीका करणारे व नदीलाच आपली शेती मानणारे कोळी समाजाच्या विकासाची आणि विकसनशीलतेची भूमिका घेऊन या समाजाची उन्नती,आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकास होईल अशी काही प्रस्तावाची मांडणी केलेली आहे."

## २. कादंबरीचे स्वरूप:-

'झावळं' ही कोळी जीवनावरील लक्षवेधी कादंबरी आहे.
१९६० नंतर औद्योगिकीकरणाऱ्या नावाखाली सरकारने अनेक प्रकल्प खेडेगावापर्यंत राबविले. त्यामध्ये 'शेतीवृध्दी' हा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. पाणी अडवून,तलाव बांधून, पाटाने पाणी पुरवून अनेक शेतकऱ्यांच्या कोरडवाहू जमिनी ,नापिक जमिनी उपजाऊ करणे हा यापाठीमागील प्रमुख हेतू होता. गरीब शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने हा उपक्रम स्तुत्य आहे. परंतु 'एका नाण्याला दोन बाजू असतात' या न्यायाने नदी हीच ज्याची शेती आहे. तिच्यावरच ज्यांचे पोटपाणी अवलंबून आहे, संसाराचे भावी जीवनस्वप्न अवलंबून आहे अशा कोळी

जमातीचे काय? याच प्रश्नाला समोर करून उत्तम तुपे यांनी 'झावळं' कादंबरी लिहून कोळी जमातीवर झालेल्या या अन्यायाला वाचा फोडली आहे. सरकारच्या डोळ्यात अंजन घातले आहे.

या कादंबरीच्या संदर्भात श्रीकृष्ण केसरी लिहितात की ,"कोळी जीवनावरील ही सुंदर कादंबरी सामाजिक अन्यायाविरूध्द लढणाऱ्यांचे लक्ष वेधून घेणारी आहे. सरकार,कोळी समाज अन् विविध संघटना प्रमुख तसेच अन्यायाची चीड असणारे समाजातील विचारवंत ह्या सर्वांनी स्वाभिमानी जीवन जगणाऱ्या कोळ्यांसाठी अन् त्यांच्या बायका-मुलांसाठी काहीतरी विधायक कार्य करायला हवे, असे ही कादंबरी वाचून वाटते,"१

कादंबरीच्या अंतरंगाबद्दल बोलावयाचे झाले तर असेच म्हणावे लागेल की,लेखकाची प्रभावी शैली डोळ्यासमोर ते ते प्रसंग साकार करणारी आहे. पती-पत्नीचे परस्परावरील प्रेम उत्कट शब्दात वास्तवतेला धरून केलेले चित्रण अतिशय प्रभावी वाटते. काशिनाथ व सोनी हे दोघे कोळी पती-पत्नी दोघांचे व्यक्तीदर्शन प्रभावीपणे प्रकट केलेले आहे.

सोनी ही माशाच्या विक्रीसाठी बाजारी गेल्यानंतर अचानक पाऊस येतो. तेव्हा काशिनाथ घरीच वाट पाहतानाचे चित्रण करताना तुपे लिहितात,

> "काशिनाथ घरी पागिरं विणत बसल्या बसल्या गावाच्या पाटंकडं नजर टाकली .कामठीवर दोन घरं विणली की, काशिनाथ बारक्या लेकरानं आईची वाट बघितल्यागत वाटकडं बघत हुता" (पृ.३)

काशिनाथ हा सोनीची अनुसती वाटचं न पाहता तो त्या दिशेने जातो. वाटेत सुभान आण्णाला विचारतो. शेवटी तो मेघाला हात जोडून सांगतो की,

> "कुठं असंल,माझी सोना? निम्या वाटत तिला पावसानं गाठलं, तर? तिला पळणं कसं हुयाचं? सोना अवघडल्याली हाय, मेघराजा

हात जोडतो,ह्यो काशिनाथ दुबळा हाया, तुझ्या बळापुढं माझं काय चालत न्हाय, देवा, माझ्या सोनीला सांभाळ सोना. मेघराजा दया कर!"(पृ.३)

एकूणच आकाशातले ढग,डोळ्यातले ढग याचे मनाला चटका लावणारे वर्णन आणि पती-पत्नीचे प्रेम समर्थ शब्दांत लेखकाने प्रकट केलेले आहे. संवादातून खास करून कोळी हा एका समाजात खालच्या मानलेल्या थरातला एक सामान्य गरीब माणूस परंतु मनाने किती मोठा, श्रीमंत असू शकतो याचे दर्शन घडते. काशिनाथ कोळी नदीचे निर्मळ खोल खोल पाणी बघून सगळं दु:ख विसरून जात होता.नदीवरच झावळं हेच त्याचे सर्वस्व होते. उपजिवीकेचे साधन होते. हे तुपेंनी एका संवादातून कथन केलेले आहे ते लिहितात,

"मनाजोगा पाऊस पडला हुता. नदीला पाणलोट येऊन गेला हुता. नदीनं तिळगूळं वाटल्यागत काशिनाथ गोड मुखानं हासत हुतां.नवा जीव आल्यागत नदी,'बाळा ,झाले तुझ्या मनाजोगे ?' लई राग धरला हुतास माझ्यावर ! आतनं आतनं नदीचं बोलल्यागत वाटलं नि सपई पाण्यावर बारक्या रेघा काढत वाऱ्याची एक झुळूक निघून गेली" (पृ.११६)

या कादंबरीतील रागालोभाचे,विमनस्क मनस्थितीचे,उत्साहाचे, भांडणाचे,वासना-विकारांचे सारे प्रसंग ग्रामीण भाषेतून असुनसुद्धा समर्थपणे डोळ्यासमोर उभे राहतात.

कादंबरीच्या काशिनाथ या नायकाचे व्यक्तिचित्र लेखकाने बऱ्याच प्रसंगातून चितारले असून कोळी समाजात अशिक्षित माणसेही मोठ्या मनाची,सुसंस्कारित असू शकतात हे लेखकाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. 'बेडकं मारली तर पोरं मुकी होतात','पावसात इस्तू टाकला की पाऊस उघडतो,' (पृ.६) 'गरवारपणात खेकडा खाऊ नये, पोर फेकडी हुत्यात खेकड्यागत चालतात'(पृ.४३),'पोरगा झाला त्याच्या

पायगुणाचा ह्यो लाभ! पोरगा दैवानं झाला.'(पृ.११०) असली अंधश्रद्धायुक्त वाक्ये,'मूठ मारून आतडी गोळा होणे'(पृ.९०) 'येळ आली हुती पर काळ आला नव्हता,'(पृ.९६)'जीव नखात आणणे,''जीवात जीव येणे'(पृ.११७) अशी अनेक म्हणी-वाक्यप्रचार पेरून हुबेहुब ग्रामीण चित्र डोळ्यासमोर उभे केले आहे. अन्यायाला तोंड देण्यासाठी लढणाऱ्या गावातली सुभ्या,इनामदार मिलिटरी मेजर, ताबुंळ्यांचा बाब्या,मारूती नरसाळे, देवाचा गुरव,हरिनारायण,भाळवणीचा पावणा,खोताचा नाऱ्या,रंग्या सरपंच,राधा,कुशाबा नाईक अशी काही सभ्य,प्रतिष्ठित, श्रीमंत,स्वार्थी-निस्वार्थी माणसांच्या प्रभावी व्यक्तिरेखा कादंबरीत रंगवल्या आहेत. ही माणसे गरीबांना आधार देऊन त्यांना स्वाभिमानाने जगण्यास प्रोत्साहित करताना दिसतात.

संपूर्ण कादंबरीच्या पानोपानी तुपे यांनी नदीचे,माशांचे,बाजाराचे,गिऱ्हाइकांचे,माशांच्या जाळ्यांचे (पागिरं,पागरी वावरी ,अळकुटं,तिवरी,भुसं,फेक) इतर साधनांचे, अनेक माशांचा नावांचे (सुग्री,काटकिंजाळ फेक ,लोळी,बारक्या,आंबळ्या,चांभार,कुत्तर,झिंग,मुगळी,कोळशा, धवर,डेंग,पहाडी,कानुसी,वाबं,मरळ) मगरीचे,डोंगराचे,खेकड्यांचे इत्यादीचे वर्णन सुंदर शैलीत लेखकाने केले आहे. संसाराच्या चढ.उताराचे वर्णन, गरीबीचे, भूकेचे,श्रीमंतीचे अगदी सगळ्या बारीक-सारीक गोष्टींचे,भावनांचे,राग-लोभाचे,प्रेमाचे-विरहाचे,भांडणाचे इत्यादीच्या साऱ्या वर्णनांनी कोळी ग्रामीण जीवन अगदी यशस्वीपणे आपल्या डोळ्यांसमोर उभे केले आहे.

## ३. कादंबरीचे वेगळेपण

एकूणच 'झावळं' या कादंबरीमध्ये आशयाला पोषक अशी कथानकाची रचना केलेली आहे. साठोत्तरी आधुनिकीकरणामुळे ग्रामीण जीवनात निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण करणे हा या कादंबरीचा

प्रमुख उद्देश आहे. ग्रामीण भागातील नदीवर मासेमारी करणारा कोळी आणि त्याच्यावर आलेले उपासमारीचे दिवस हा या कादंबरीचा विषय आहे. काशिनाथच्या जीवनातील संघर्षामुळे हा विषय अधिक परिपक्व झालेला आहे. आधुनिकीकरणामुळे नदीवरील मासेमारी पद्धती नष्ट झाली. कोळी जमातीतील कुटुंबे नष्ट होऊन ती कुचकामी बनली आणि त्यांना जगनेच असाह्य झाले. अशा या मुख्य धाग्याभोवती कादंबरी चित्रीत झालेली आहे.

नदीवर मासे धरण्याचा व्यवसाय करणाऱ्या 'मासेमारी कोळी ' या जमातीवर लिहिलेली पहिली कादंबरी आहे या कादंबरीतून सर्व महाराष्ट्रातील कोळी जमातींच्या भौगोलीक, सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्व स्थितीचा अंदाज घेऊन त्यांच्यावर सरकारने म्हणजेच औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या धरणांनी कसा अन्याय केला आहे. त्यांच्या धंद्याला कसे नामशेष केले आहे. आदीबाबीवरच्या समस्या चित्रित करणारी प्रातिनिधिक स्वरूपाची ही कादंबरी आहे. श्रीकृष्ण केसरी म्हणतात त्याप्रमाणे, "कोळी जीवनावरील ही सुंदर कादंबरी सामाजिक अन्यायाविरूद्ध लढणाऱ्यांचे लक्ष वेधून घेणारी आहे. सरकार कोळी समाज अन् विविध संघटना प्रमुख तसेच अन्यायाची चीड असणारे समाजातील विचारवंत ह्या सर्वांनी स्वाभिमानी जीवन जगणाऱ्या कोळ्यांसाठी अन् त्यांच्या बायका-मुलांसाठी काहीतरी विधायक कार्य कारयला हवे, असे ही कादंबरी वाचून वाटते."

खेडेगावी नदीच्या गावी कोळ्यांना खूप महत्त्व होते. पखालीने पाणी वाढणे,नाव चालवणे,मासेमारी करणे अशा स्वरूपाची कामे कोळी जमातीत परंपरागत चालत आलेली आहेत. या धंद्यांनाच प्रमाण मानून कोळी बांधव आजपर्यंत आपल्या कुटुंबाची उपजिवीका चालवत आलेला आहेत. परंतु औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या धरणांनी मासेमारी करणाऱ्या कोळी कुटुंबांना कशे नामशेष केले यांचे सुरेख चित्रण प्रथमत: तुपेंनी 'झावळं' मधून केलेले आहे.

'झावळं' कादंबरीत' माणदेशी परिसर' येतो. त्याच प्रांतातील

ग्रामीण बोली तुपेंनी संवादासाठी वापरून कादंबरीच्या कथानकाला आशयघन बनविले आहे. कादंबरीतील सर्व घटना प्रसंग नदीवर घडतात. कोळी कुटुंबाचे नदीशी असणारे नाते व एक वर्षाची संपूर्ण हकीकत या कादंबरीमध्ये चित्रीत केलेली आहे. सरकारच्या धरणाच्या प्रकल्पामुळे व त्यावरील मासेमारीचे ' कॉन्ट्रॅक्ट हे विशिष्ट सत्तेधाराना दिल्यामुळेच कोळी समाजावर उपासमारीची पाळी आली आणि अशाच या कोळ्यांच्या नशिबी आलेले दैन्य,दारिद्रय,शोषण ,उपहास,अज्ञान,व्यथा-वेदना या विभिन्न प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम 'झावळं' या कादंबरीने केलेले आहे.

कादंबरीचा नायक काशिनाथ हा 'कोळी ' या खालच्या मानलेल्या थरातल्या समाजातील एक सामान्य माणूस परंतु मनाने किती मोठा,श्रीमंत असू शकतो याचे दर्शन घडवून कोळी जमात करीत असलेल्या समाजसेवेला व माणूसकीला वाचा फोडलेली आहे. म्हणून या सर्व बाबतीत ही कादंबरी मला महत्त्वाची वाटते.

## ३. 'पखाल' कादंबरीच्या आशयाचे स्वरूप

'झावळं' कादंबरीच्या आशयाच्या स्वरूपाचा विचार केल्यानंतर 'पखाल' या बाबाराव मुसळे यांच्या कादंबरीचा त्याच अनुषंगाने विचार केल्यास या कादंबरीच्या आशयाचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल म्हणून त्यासंबंधीची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

## १. शीर्षक व मुखपृष्ठाचा समर्पक समन्वय:-

बाबाराव मुसळे यांनी 'पखाल' या कादंबरीची शीर्षक व मुखपृष्ठाची योजना कादंबरीच्या कथानकाच्या आशयाशी तंतोतंत जुळणारी अशी केली असल्यामुळे 'पखाल' कादंबरी वाचकाला सहजासहजी उलगडत जाते. मुखपृष्ठ,शीर्षक आणि आतिल आशय या

तिन्हींचा लेखकाला समर्पक समन्वय साधता आलेला आहे.'पखाल' वाचल्यानंतर आपणाला असे जाणवने की,या कादंबरीतील पुजांचे लेखकाने निर्माण केलेले व्यक्तिचित्र हे संपूर्ण 'पखाल' शी संबंधित आहे. पखाल आणि पुंजा ह्या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तो पूर्णपणे आपल्या व्यवसायात एकरूप व समरस झालेला आहे. गावात 'नळयोजना' आल्याने बलुत्यांना पाणी वाढण्याचे काम बंद पडलं आणि पुजांचं सारं कुटुंब नळयोजनेच्या पाण्याखाली बुडून गेलं. या सर्व दृष्टीने विचार केल्यानंतर लेखकाने कादंबरीला दिलेले शीर्षक समर्पक व योग्यच दिले आहे असे वाटते.

'पखाल' या कादंबरीचा प्रारंभ ते अखेरपर्यंत प्रमुख विषय पखालीने आपल्या बलुत्याला पाणी वाढणे हीच सेवा मानून आपले सारे आयुष्य त्यासाठी खर्च करणाऱ्या कोळी जमातीवर औद्योगिकीकरणाच्या सुधारणेच्या नावाखाली आलेल्या नळयोजनेने कसा अन्याय केला आणि त्यावर अवलंबून असणारी सारी कोळी कुटुंबे कशी उद्ध्वस्त झाली या वाताहातीचा धागा संबध कादंबरीच्या कथानकात विणून आशय समृद्ध केला आहे. नवीन साठोत्तरी औद्यागिकीकरण गावोगावी नळयोजनेचा उगम आणि त्यामुळे पखालीने पाणी वाढणाऱ्या कोळी जमातीचा झालेला अस्त. हाच विषय संपूर्ण कादंबरीवर यथायोग्यपणे लेखकाने चित्रीत केलेला आहे.

घरोघरी पाणी वाढणारा कोळी हा गावातील सर्व लोकांची पाण्याची निकड भागविण्यासाठी म्हैस अथवा हाल्या यावरती कातड्याची तयार केलेली पिशवी वापरतो. त्यास 'पखाल' असे म्हणतात. या पखालीला दोन्ही बाजूंनी पाणी भरण्यासाठी वरती दोन्ही बाजूंना दोन छोटे कप्पे तर पाणी सोडण्यासाठी पुढील दोन बाजूंना तोंडे असते त्यास मुंडा असे म्हणतात. ज्यावेळी कोळी पाणी भरण्यासाठी नदीवर जातो त्यावेळी तो एका डोलाने त्या पखालीत पाणी भरतो. त्यावेळी पुढील तोंड (मुंडा) दोरीने बंद केलेली असतात. ती भरलेली पखाल घेऊन कोळी हा आपल्या ठरलेल्या बलुत्यांच्या घरोघरी जाऊन त्यांना आवश्यक तेवढे पाणी

पुरवितो. एका पखालीत साधारणपणे दहा ते बारा घागरी पाणी मावते. रस्त्यावरून जात असतात त्या पखालीच्या पाण्याची दोन्ही बाजूंची धार नदीपासून घरोघरी रेषा उमटवत जात असलेली दिसून येते. त्यामुळे बलुत्यांना कोळी हा कोणत्या गल्लीत आला आहे हे समजते. बलुत्याच्या आवश्यकतेनुसार व गरजेनुसार तो पाणी वाढतो. आपली पखाल पहाटे सर्वसाधारण साडेचार पासून दुपारी १२ पर्यंत आणि सायंकाळी ४ पासून बलुत्याचे पाणी संपेपर्यंत हाकत असतो. गावात एखादे लग्न वा कार्यक्रम असला तर कोळी कुटुंबाला दिवसभर पखाली हाकाव्या लागतात.

'पखाल' हा कोळी लोकांचा परंपरागत चालत आलेला व्यवसाय आहे. एका पखालीच्या मोबदल्यात वर्षाची आठ पायल्या ज्वारी,तूर,उडीद,मूग यांची आधली दाळ,अर्धा किलो मिरच्या,दररोजची एक भाकर त्यावर भाजी याशिवाय खळे-पाळे,खुडणं,रानातल्या रानवळा पूर्वीच्या काळी मिळत या धान्याच्या स्वरूपातच आपल्या पखालीचा मोबदला मिळत असे परंतु जसजसे दिवस बदलले. तसतशी लोकांची प्रवृत्तीदेखील बदलली लोकांची मनं शाबूत राहिली नाहीत. लोक जे देतात ते कुरकुरत देतात. याशिवाय लग्न वा इतर समारंभांना पाणी वाढल्यास,बांधकामासाठी पाणी वाढल्यास कोळी पती-पत्नींना संपूर्ण कपड्यांचा आहेर व लग्नाचे वाढान देण्याची प्रथाही बलुत्यामध्ये आहे.

अशी ही 'पखाल' पुंजाची जीव की प्राण होती पखाल हेच त्याचे व कुटुंबियाचे उपजीविकेचे साधन होते. पखाल ही पुंजाचे सर्वस्व आहे आणि ती केवळ नळयोजना व हापस्या आल्याने बंद झाल्यामुळे पुंजा हा मनस्तापाने वेडसर बनतो. प्रसंगी नळाचे पाणी भरले म्हणून पत्नी गिरीजाला मारतो घागरदेखील फोडतो. मुलगा दगडूने पाण्याची टाकी बांधण्यासाठी पाणी वाढले म्हणून हासडाने सपासप सपके देतो. 'पखाल' ही जावाई विचारपूस न करता मागतो म्हणून त्याला तोडून बोलतो. काहीही झाले तरी तो पखाल देण्यास तयार नाही म्हणजेच 'पखाल च्या विश्वाभोवतीच कादंबरी केंद्रभूत असल्यामुळे दिलेले शीर्षक समर्पक असे वाटते.

प्रस्तुत साऱ्या कादंबरीतुनच 'पखाल कातडी पाण्याची पिशवी, तो हाकलणारा 'पखाल' कादंबरीचा नायक म्हणून पुंजा तसेच आशयात्मक कथानकाचे शीर्षक ,मुखपृष्ठ यांचा समन्वय बाबाराव मुसळेंती योग्य पतीने साधला आहे असेच आपणाला म्हणावे लागेल.

## २. कादंबरीची पार्श्वभूमी

### १. लेखनकाल व हेतू

'पखाल' ही बाबाराव मुसळे यांची १९९५ साली प्रकाशित झालेली आणि पखालीने पाणी भरणाऱ्या पखाली कोळी समाजाच्या जीवनाचे चित्रण करणारी १६८ पृष्ठांची कादंबरी आहे. आपल्या लेखनाचा हेतू स्पष्ट करताना मुसळे 'मोहरलेला चंद्र' (१९९२) या कथासंग्रकाच्या मनोगतात लिहितात,"१९६० नंतरच्या राजकीय,सामाजिक,सांस्कृतिक,धार्मिक,आर्थिक, स्थित्यंतरासोबतच विज्ञान व तंत्रज्ञानाने ग्रामीण जीवनात केलेली आश्चर्यकारक प्रगती गांभीर्याने ध्यानात घेतले. एकीकडे भौतिक सुखसाधनांची होणारी रेलचेल आणि दुसरीकडे त्याचवेळी हरपू पाहणारे माणसातील माणूसपण ह्या परस्परविरोधी चित्राने प्रचंड अस्वस्थ झालो. हे सारे शक्य तेवढ्या प्रमाणात कथेच्या माध्यमातून उभे करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे"[२]

### २. कादंबरीचे स्वरूप

'पखाल' या कादंबरीतून बाबाराव मुसळे यांनी पखालीने पाणी वाढणाऱ्या कोळ्यांचे जीवन अतिशय चांगल्या रितीने चित्रीत करून सर्व वाचकांचे लक्ष केंद्रीत केले आहे. पुजांच्या कुटुंबाची ही कहाणी चटका लावणारी आहे. १९६० नंतर औद्योगिकीकरण आणि सुधारणेच्या नावाखाली सरकारने अनेक प्रकल्प खेडेगावापर्यंत राबविले त्यामध्ये

'नळयोजना' हा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. पाण्याची टाकी बांधून घरोघरी नळाव्दारे पाणी पुरवून अनेक लोकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविणे हा या पाठीमागील प्रमुख उद्देश होता. लोकांची अत्यावश्यक गरज 'पाणी' यादृष्टीने हा उपक्रम स्त्युत्य आहे. परंतु 'एका नाण्याला दोन बाजू असतात' या न्यायाने पाणी वाढणे हेच ज्यांचे उपजिवीकेचे साधन आहे. तिच्यावरच ज्यांचे पोटपाणी अवलंबून आहे. संसाराचे भावी जीवनस्वप्न अवलंबून आहे अशा कोळी जमातीचे काय? याच प्रश्नाला समोर करून बाबाराव मुसळे यांनी 'पखाल' कादंबरी लिहून कोळी जमातीवर झालेल्या या अन्यायाला वाचा फोडली आहे. या कादंबरीच्या संदर्भात प्रा.कृष्णा चौधरी लिहितात,"परंपरागत नाळ तोडून जीवनाचा नवा अर्थ शोधणे' ही ग्रामीण मनापुढील नवीन समस्या होती. 'पखाल' मधील पुंजाच्या बलुतेदारांच्या रूपाने आधुनिक ग्रामीण मनाची संवेदना अशीच भयकंपित होऊन दुभंगून गेलेली दिसते. 'झाडाझडती' त धरणाच्या पुनर्वसनामुळे जशी विस्थापंताची वाताहात होते तशीच 'पखाल' मध्येही पुंजाच्या जीवनाची वाताहात झाली आहे"[३]

कांदबरीच्या अंतरंगाबद्दल बोलावयाचे झाल्यास 'पखाल' ही कादंबरी 'कोळी' या उपेक्षित जातीचं चित्रण करते. पखालीने पाणी भरणारा पुंजा हा कोळी जातीतील वयस्कर पुरूष या कादंबरीचा नायक आहे. पुंजा हा थंडी,वारा,ऊन,पाऊस यांना न घाबरणारा असा कष्टकरी आहे. मांड्यापर्यंत वर खोचलेलं धोतर अंगात फाटकं-तुटक शर्ट किंवा बनेन,डोक्यावर मळकी टोपी, हातात म्हशीला हाकलण्यासाठी वावभर लांबीची चऱ्हाट असा पुंजा जातीनं कोळी आहे. पावसाळ्यात घोंगता,छत्री,उन्हाळ्यात पायात चप्पल,हिवाळ्यात स्वेटर,मफलर याची त्याला कधीच गरज वाटलेली नसते. गावातील प्रत्येक घरात पखालीने पाणी देणाऱ्या पुंजाला मोबदला म्हणून बलुतेदारी पद्धतीने उदरनिर्वाह करावा लागतो. पहाटेपासून ते रात्रीपर्यंत घरोघरी पाणी भरण्याच्या कामात त्याला मदत करणारी त्यांची पत्नी गिरीजा ही सुद्धा कष्टकरी

स्त्री. त्याचा मुलगा दगडू हा आधुनिक काळातील श्रमापेक्षा आरामाचा हव्यास बाळगणारा युवक त्याची बायको सुमन या चौघांचा जीवनक्रम या कादंबरीत आहे. अत्यंत हलाखीची परिस्थिती असूनही कोणाकडेही भीक मागून खाण्यापेक्षा मरेस्तोवर कष्ट करून हक्काचं खाण्यातच या पुंजाचे व त्यांच्या कुटुंबियांनी समाधान मानलेलं असतं. परंतु गावात येणाऱ्या नळयोजनेमुळे पुंजा पूर्णपणे हादरून जातो कारण घरोघरी नळ आले तर त्यामुळे वर्षानुवर्ष चालणारा त्यांचा धंदा बंद होणार असतो. ~~पखाली व्यतिरिक्त चालणारा त्यांचा धंदा बंद होणार असतो~~.पखाली शिवाय कोणतचं उदरनिर्वाहाचं साधन त्याच्याकडे नसल्यामुळे गावात नळयोजना येणार हे ऐकताच त्याच्या वागण्यात हळूहळू फरक जाणवू लागतो. आणि जसजसं या योजनेचं काम पूर्ण होत असतं तसतसं त्याच्या वागण्यात फरक होऊन पुंजा वेडा झाल्याची बातमी गावभर पसरते. पुढे हे कोळी कुटुंब नाइलाजास्तव गाव सोडून जाते. म्हणजेच प्रस्तुत कादंबरीने कोळी समाजाच्या जीवनाचा वास्तववादी पार्श्वभूमीवर आढावा घेतलेला आहे  या कादंबरीविषयी डॉ.मधुकर वाकाडे म्हणतात त्याचप्रमाणे,"पुंजा पखालकऱ्याचं जीवन अतिशय समर्थपणे शब्दबद्ध केले आहे.एक समर्थ अशी ही कलाकृती आहे यात संदेह नाही"[४]

पुंजा या व्यक्तिचित्राभोवती संपूर्ण कादंबरी केंद्रभूत आहे. पुंजा हा पखालीने पाणी भरणारा साधा भोळा अशिक्षित माणूस स्वभावाने अत्यंत तापट ,मनाने मोठा ताठर आणि स्वाभिमानी, मोडून पडणे पसंत असलेला परंतु जराही न वाकणारा,न भिणारा कुणाच्या अध्यात-मध्यात न पडता आपले पखालीचे काम नीट करणारा प्रसंगी हेकटपणे वागणारा पखालीच्या व्यवसायावर गावातील नळयोजनेमुळे गंडातर येते त्यामुळे अंतर्बाह्य हादरून गेलेला.नळयोजनेमुळे आपला पखालीचा व्यवसाय लवकरच बुडणार असल्यामुळे मानसिक संतुलन गमवून बसतो. गावातील लोक त्याची हेटाळणी करतात त्याला नळयोजनेच्या निमित्ताने डिवचतात. तो पिसाळतो. लोक त्याला वेड्यात काढतात. तरीही सुन्न मनाने आपले पखालीचे काम करतो.    दगडू त्याचा मुलगा पखालीच्या

कामात मदत करतो. तसे मनापासून त्याला पखालीचे काम आवडत नाही. परंतु पुंजाने त्याला शाळेत जाऊ दिले नाही. नाईलाज म्हणून तो यंत्रगत पखालीचे काम करतो. सुमन ही त्याची पत्नी कोळी समाजाचा नेता हरिभाऊ यांची मुलगी समंजस आणि मनमिळावू,गिरीजा ही पुंजाचा संसार निटनेटका करण्यासाठी जिवाचे रान करणारी,कर्तव्यसंपन्न अशी पुजांचा हेकट तापट स्वभाव स्वत: पचवून कोणतीही तक्रार न करता जगणारी आणि वेळप्रसंगी पुंजाने केलेल्या आडमुठेपणाचा आपल्या संसारवर परिणाम होऊ नये म्हणून सरपंचाची,भाऊरावची,रघ्याची मनधरणी करते. संसाराला पडलेले छिद्र बुजवताना तिची दमछाक होते. गावात सरपंच आणि दशरथ पाटील असे दोन गट जवळचे नातेवाईक परंतु परंपरेने दोन्ही कुटुंबात वेबनाव.

याशिवाय विठ्ठल भांबळे, त्याची बायको मानदारीन रेणू पाटलीन ही पुंजाच्या कुटुंबाला जवळ करणारी तर सरपंच,भाऊराव,रघ्या,रूस्तुमा ही पुंजाला बरबाद करू पाहणारी पात्रे बाबाराव मुसळेंनी समर्थपणे रेखाटली आहेत. या पात्ररचनेसंबंधी डॉ.किशोर सानप लिहितात की,"पखाल मध्ये बाबाराव मुसळे यांनी मानवी स्वभावाचे अनेक बारकावे सत्य आणि तथ्य पार्श्वभूमीवर मांडले आहेत. "पखाल" ची वीण म्हणूनच वास्तववादी द्रव्याचा अविष्कार करताना दिसते."[५] पखालमधील पुंजाची कौटुंबिक पार्श्वभूमी व गावातील राजकीय वातावरण यासंबंधीचे मत नोंदविताना डॉ.आशा साबदेकर . म्हणतात,"बाबाराव मुसळे यांची ही कादंबरी पुंजा ,त्याची बायको गिरीजा, मुलगा दगडू, त्याची बायको सुमन व्दाही हरिभाऊ मुलगी कचरी, तिचा नवरा –सासरची माणसं अशा कौटुंबिक वर्तुळात नंतर गावातील माणसं हा समाज, सरपंच, पाटील गावातलं राजकारण अशा राजकीय वर्तुळातून फिरत फिरत वेगवेगळे थर दर्शवित जाते शेवटी आवाक्यात येते ते ग्रामजीवन,"[६] विनायक घुगे लिहितात,"राम गणेश गडकऱ्यांची सिंधू अन् सुधाकर यांच्या तुलनेत आपली गिरीला व पुंजा कुठे कमी लेखता येण्यासारखं वाटत नाही.

त्यांचा विषय जरी वेगळा असला तरी पात्र मात्र एकमेकांशी जुळवून घेणारी ठरतात. जो माणूस आपल्या धंद्याशी इतका समरस होतो व अचानक त्याच्या मनाविरूध्द जेव्हा असं वादळ उठते तेव्हा तो पुंजासारखा पागल होतो."[७] डॉ. आशा साबदेकरांनी पुंजा बाबतीत केलेले विधान समर्पक आहे.,"पुंजा हा उद्धवशेळकेच्या कौतिकेचा वंशज आहे. जगानं दिलेली हार पत्करताना कौतिक मनातून तुटून जाते. भग्न होते. पागल होते पुंजाही मनाने तुटतो आपल्यालाच बाप म्हणणाऱ्या वंजारी मुलीवर आपण रागावलो हे कळताच तो आणखी कोसळतो आपल्या इज्जतीवर उठणाऱ्या परभीच्या फुकटच्या भाकरी काढण्यात तर घुसमटून जातो"[८] एकूणच या कादंबरीतून माणसे जन्मत:च क्रूर नसतात. काही घटना प्रसंगाने ती तशी बनतात पण त्यागाचे आदर्श डोळ्यासमोर आल्यास कठोर माणसेही लोण्यासारखी मऊ होतात हा दाखला या कादंबरीने दिलेला आहे.

कादंबरीमध्ये लेखक घटना – प्रसंगाची निर्मिती करीत असतो. हे घटना –प्रसंग कथानक सांगण्यासाठीच आलेलेअसतात. लेखक घटना प्रसंगाची गुंफन चांगल्याप्रकारे करू शकला तरच वाचक त्यामध्ये अधिक समरस होईल. कारण याचा मुख्य उद्देश कथा चांगल्याप्रकारे पोहचावी हाच असतो. त्यामुळे लेखकाचे त्याबाबतीत असणारे कौशल्य महत्त्वाचे असते. लेखक आपल्या कादंबरीत काही घटना – प्रसंग व त्याला पोषक असे इतर लहान– सहान घटना– प्रसंग निर्माण करीत असतो.

बाबाराव मुसळे यांच्या ' पखाल ' या कादंबरीमधून ग्रामीण जीवनाचे चित्रण असल्यामुळे या कादंबरीची जडणघडणही अनेक ग्रामीण प्रसंगामधून झालेली आहे. तसेच या कादंबरीचे कथानक व पात्रांचे व्यक्तिमत्त्व प्रकट करण्यासाठीच या घटना प्रसंगाची निमिती लेखकाने केलेली दिसते.'पखाल ' या कादंबरीमध्ये पुंजाची व्यक्तिरेखा प्रमुख असल्याने या व्यक्तिरेखाभोवतीच अनेक घटनाप्रसंग गुंफलेले आहेत.

पुजां हा ग्रामीण भागातील बलुतेदार असून त्याला आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी तो पाणी भरण्याचे काम करतो. कुटुंबाचे जीवनमान समृद्ध व्हावे यासाठी तो आपल्या धंद्यात सतत गुंतून राहतो. सतत त्याची उद्योगी घडपड बारा महिने चोवीस तास वेळी-अवेळी उन-वारा असो वा पाऊस असो चाललेली असते नेमकी हीच धडपड विविध प्रसंगातून चित्रित करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे

१. गावात नळयोजना येणार हे कळाल्यावर सैरभैर झालेली गिरजा व तिच्या मनाची उलघाल(पृ. ८-१०)
२. गिरजाच्या अंगात अचानक ताप भरल्याने मनाई करूनही सुमन गवताचा भारा आणायला गेल्यावर ती येईपर्यंत गिरजाच्या मनाची झालेली तगमग (पृ. २६ ते ३२)
३. सुदीच्या महादेवाबद्दलची दंतकथा व त्या अनुषंगाने लोकांच्या मनातील स्थापित झालेल्या श्रध्दा (पृ. ५०)
४. नळयोजनेच्या पाण्याच्या टाकीच्या कामावर पुंजानं नाकारूनही दगडूच्या पखाली टाकण्यातून उद्भवलेला प्रसंग (पृ. ७६-७९)
५. नळयोजनेची वर्गणी गिरजानं भरली म्हणून राग आल्याने गिरीजाला पडलेला पुंजाचा मार. अबोला व नंतर मध्यरात्री गिरजाच्या पायावर पडून रडणारा व मन मोकळं करणारा पुंजा (पृ. ८०-८२)
६. भागी भोवळीनीनं दगडूच्या हाती सत्यनारायणाची पूजा म्हणून नदीत शिरवायला दिलेलं आपल्या राधा या तरुण लेकीचं अर्भक आणि त्यातून उद्भवलेल्या पोलीस चौकशीत रूस्तम्याचं नाव घेईपर्यंतचा प्रसंग (पृ. १०५ ते ११०)
७. सरपंच आणि रघ्याच्या चौकटीत पुंजाच म्हशी चोरून पळविल्यानंतर त्या सोडून आणेपर्यंतचा प्रसंग (पृ. ११० ते ११५)
८. जागेच्या अडचणीमुळे राजूला घेऊन व गिरजा ज्या शंकर भोवळ्याकडे झोपायला जातात त्याच्या रेखा नावाच्या मुलीला सरपंचाचा फूस लावण्याचा होणारा सासुरवास आणि त्यातून येणारा माणूसकीचा गहिवर (पृ. ११७ ते १२०)

९. गावात नळयोजनेच्या कामावरील बंजाराच्या बायाका पुंजाला हसतात म्हणून त्यासोबत झालेले भांडण पण त्याला हसतात याचा एका बंजारणीनं केलेला गौप्यस्फोट (पृ. १२० ते १२२)

१०. यादव गोळ्यावर गुदरलेला आणि गिरजाला आठवलेला प्रसंग (पृ. १२५ ते १२६)

११. जीपनं हॉर्न देवूनही पुंजानं जीपला बगल न दिल्यामुळे पुंजाची झालेली बाचाबाची व त्यानंतर पोलिस येईपर्यंत थरकाप उठविणारा प्रसंग ( पृ. १४५ ते १५० )

१२. पुंजाचा हेकड व भांडखोर स्वभावामुळे गिरजाला पडलेलं पुंजाचं स्वप्न यामध्ये पुंजाच रक्त विहीरीतून टाकीत, टाकीतून पाईपात, पाईपातून नळाद्वारे तिच्या घागरीत पडलेले रक्त, गिरजा पाणी भरते म्हणून तिला पडलेला मार, सुमनला पडलेला मार, तिचा गर्भपात, त्यामुळे पुंजाची भ्रमिष्ठ भटकंती, सुनेला मागितलेली माफी. (पृ. १५६ ते १६८)

या घटना-प्रसंगाचा संबंध मुसळेंनी वैयक्तिक तथा सामुहिक नेणीवेशी जोडला आहे. हे नेणीव विचार कक्षेतील जाणीवेशी अत्यंत कल्पकपणे गुंफली गेली असून या संश्लिष्ठ गुंफणीतून या कादंबरीतला अनुभव तरला आणि जिवंत झाला आहे. यासंबधी श्रीकृष्ण पराते आपले मत नोंदवतात. " "

" समृद्ध व तरल अशा जाणीव - नेणीवेतून साकारलेल्या जनजाणिवेतून गतिमान झालेले पखाल या कादंबरीचे कथानक निश्चितच कलात्मक दृष्टीकोणाचे फलित आहे, असे म्हणावयास हरकत नाही . या कादंबरीतील वैयक्तिक ते सामूहीक नेणीवे दरम्यानचा सेतू, जनसंस्कृती समृद्धीला कारणीभूत ठरला आहे. आणि या कलाकृतीच्या कलाविस्कारामागचा प्रत्यक्ष जाणवलेला हेतू हा असावा असे म्हटल्यास वावगे ठरू नये" [९]

संपूर्ण कादंबरीमधून बाबाराव मुसळेंनी नदीचे, पखालीचे, बलुतेदारीचे व नळयोजनेच्या आगमनाने कोळी कुटुंबात

झालेल्या वाताहातीचे सुरेख चित्रण केलेले आहे. एकंदरीत सारांशपणे विचार करता असे लक्षात येते की, पुंजा हे या कादंबरीतील मध्यवर्ती पात्र आहे. संपूर्ण कादंबरी ही त्याच्याभोवतीच फिरत आहे. पुंजाला आपण कल्पनेने जरी कादंबरीतून वगळतो म्हटलं तरी देखिल कादंबरीला काहीच अर्थ राहणार नाही. यादृष्टीने कादंबरी महत्त्वाची आहे

एकूनच 'पखाल' या कादंबरीमध्ये आशयाला पोषक अशी कथानकाची योजना केलेली आहे. विदर्भातील एका खेडेगावातील कोळी-जमातीचे, ग्रामीण वास्तवाचे जिवंत चित्रण वास्तववादी शैलीच्या अंगाने केलेले आहे. पखालमध्ये म्हणी-वाक्यप्रचार, प्राक्कथा व वऱ्हाडी बोलीची रूपे ही भाषाशैलीची सामर्थ्य दर्शवितात. १९४५ नंतर महाराष्ट्रात होऊ लागलेल्या सुधारणात्मक योजना व त्यामुळे ग्रामीण भागातील बलुतेदारीवर त्याचे झालेले परिणाम चित्रीत करणे हा या कादंबरीलेखनामागील उद्देश आहे. ग्रामीण भागात घरोघरी पखालीने पाणी घालणारा कोळी आणि त्याच्यावर आलेले उपासमारीचे दिवस हा या कादंबरीचा विषय आहे. पुंजाच्या जीवनातील संघर्षामुळे हा विषय अधिक परिपक्व झालेला आहे. नळयोजनेने कोळी समाजाच्या कुटुंबास कसे गिळंकृत केले त्याची कहाणी म्हणजे प्रस्तुत कादंबरी आहे.

या पद्धतीने अनेक प्रकारच्या घटना-प्रसंगातून कथानकाला लेखकाने गती दिलेली आहे. ग्रामीण वातावरण, बोलीभाषा निर्माण करण्याच्या दृष्टीने या कादंबरीत अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते.

## ३. कादंबरीचे वेगळेपण

' झावळं ' (१९९१) या उत्तम बंडू तुपे यांच्या कादंबरीनंतर 'पखाल' (१९९५) ही बाबाराव मुसळे यांची पखालीने पाणी भरण्याचा व्यवसाय करणाऱ्या ' पखाली कोळी ' या जमातीवर लिहिलेली कादंबरी आहे. तुपे यांनी ' झावळं ' मध्ये नदीवर मासेमारी करणाऱ्या कोळी

समाजाची तर मुसळेंनी पखालीने पाणी भरणाऱ्या कोळी समाजाची व्यथा, वेदना, विद्रोह, दैन्य, दारिद्र्य, शोषण, उपहास व अज्ञान मांडलेले आहे. ग्रामीण भागात दु:खद आणि असाह्य जीवन मुसळेंनी आशयदृष्ट्या म्हणून वापरले आहे. ' पखाल ' कादंबरी ही शोकांतिका आहे. ज्यांनी गावातील बलुंत्याच्या व्यवसायाला सर्वस्व मानले आणि ग्रामस्थांची प्रामाणिक सेवा केली. त्याच कोळी बलुत्याला विज्ञान-तंत्रज्ञान व औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या हापश्या व नळयोजना यांनी कसे गिळून टाकले आणि त्यांची अवस्था कावरलेल्या कुत्र्यासारखी दयनीय झाली या अवस्थेचे प्रत्ययकारी चित्रण मुसळेंनी केलेले आहे.

' पखाल ' कादंबरीत वऱ्हाड प्रांत येतो. निवेदनासाठी आणि संवादासाठी वऱ्हाडी ग्रामीण बोलीचा वापर करून कथानकाला आशयघन बनविले आहे. कादंबरीतील सर्व घटना- प्रसंग कोळी जीवनाशी निगडीत आहेत. कोळी कुटुंबाचे बलुत्याशी असणारे नाते कादंबरी चित्रीत करते.औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या विविध योजनांनी बलुतेपद्धतीचा ऱ्हास कसा केला व परंपरागत व्यवसाय करणारी कुटुंबे कशी उद्ध्वस्त झाली याचे सुरेख चित्रण या कादंबरीतून आल्याने वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

पखाल कादंबरीत नळयोजनेने कोळी जमातीला कसे गिळंकृत केले, तिच्या येण्याने कोळी जातीतील जीवन अंधारमय कसे झाले ? कोळी जीवनातील सूर्य कसा मावळला ? पखालीची रांडवबाई नळयोजना, तिने कोळी लोकांचा धर्म कसा बुडविला आदि प्रश्नांची मांडणी वाचकासमोर उपस्थित केली आहे.

एकूनच बाबाराव मुसळे यांची 'पखाल' ही कादंबरी कोळी जमातीचे, पुंजाची वाताहत घेऊन आली. 'पखाल' या कादंबरीत बलुतेदारीनं पत्करलेल्या पाणी भरण्याच्या कामात आयुष्य वेचणाऱ्या कोळी जमातीच्या माणसांच्या वाट्याला आलेल्या दारिद्र्याचे, उपहासाचे त्यांच्या खोलवरच्या वेदनेचे सूक्ष्म चित्र रेखाटले आहे.

## ४. समारोप

'झावळं ' व ' पखाल ' या कादंबरीच्या आशयाचे स्वरूप पहात असताना सुरवातीलाच या स्वरूपाविषयीची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर दोन्ही कादंबरीच्या आशयाचे स्वरूप हे शीर्षक व मुखपृष्ठाचा समर्पक समन्वय, कादंबरीची पार्श्वभूमी व कादंबरीचे वेगळेपण या मुद्याच्या अनुषंगाने पाहिले. या मुद्याचा विचार करीत असताना ' झावळं ' हे उत्तम बंडू तुपे यांनी तर पखाल या बाबाराव मुसळे यांनी कादंबरीला शीर्षक का दिले ? याचा आणि मुखपृष्ठाचा तसेच कादंबरीतील सामाजिक, भौगोलिक, राजकीय, धार्मिक संदर्भाचा घटनाप्रसंगाचा विचार केला.

या कादंबरीची पार्श्वभूमी पाहताना लेखनकाल, निर्मितीमागील हेतू व कादंबरीच्या स्वरूपामध्ये कथानक, पात्ररचना, संवाद, घटना-प्रसंग, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, निवेदन, संघर्ष आदी बाबी विचारात घेतल्या तसेच कादंबरीचे वेगळेपणाचाही प्रस्तुत प्रकरणात विचार केलेला आहे.

सारांशपणे या कादंबऱ्यांच्या स्वरूपाचा विचार करता 'झावळं' ही नदीवर मासेमारी करणाऱ्या कोळी जमातीवर आणि 'पखाल' ही नदीवर पखालीच्या साहाय्याने पाणी वाढणाऱ्या कोळी जमातीवर केंद्रभूत अशा कादंबऱ्या आहेत. झावळं मधील काशिनाथ व पखालमधील पुंजाची औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या धरण, नळयोजना, हापस्या यांनी कशी वाताहात केली व कोळी कुटुंबे कशी नामशेष झाली यांचे वास्तववादी दृष्टीकोणातून चित्रण दोन्ही कादंबरीकारांनी केलेले आहे. सदर दोन्ही कादंबऱ्या कोळी जीवनाचे चित्रण तर करतातच पण त्याचबरोबर त्यावर आलेले उपासमारीचे दिवस तेवढ्याच ताकतीने मांडतात. म्हणूनच वाचकांच्या ह्या कादंबऱ्या लक्ष वेधतात.

# संदर्भ ग्रंथ सूची


१. श्रीकृष्ण केसरी, ' महाराष्ट्र साहित्य पत्रिका ',
जुलै-सप्टेंबर ,१९९४ , पृ. ९७

२. बाबाराव मुसळे, ' मोहरलेला चंद्र ' (मनोगत) मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, प्रथमावृत्ती , १९९२

३. प्रा. कृष्णा चौधरी, ' दै लोकमत ' (औरंगाबाद आवृत्ती)
रविवार दि. ९ जून, १९९६

४. डॉ. मधुकर वाकोडे, बाबाराव मुसळे यांना ' पखाल ' या कादंबरीविषयी पाठविलेले अभिप्राय पत्र दि. २८ नोहेंबर ,१९९५

५. डॉ. किशोर सानप, ' मराठी कादंबरीतील नैतिकता ',बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, प्रथमावृत्ती, १९९८. पृ. ९६

६. डॉ. आशा साबदेकर, ' दै तरूण भारत ' ( नागपूर आवृत्ती)
१३ डिसेंबर, १९९८

७. विनायक घुगे, बाबाराव मुसळे यांना 'पखाल' या कादंबरीविषयी पाठविलेले अभिप्राय पत्र
दि. १५ नोहेंबर, १९९८

८. डॉ. आशा साबदेकर, ' दै तरूण भारत ' ( नागपूर आवृत्ती)
१३ डिसेंबर ,१९९८

९. डॉ. कृष्णकांत पराते, ' अक्षरवैदभी '
एप्रिल-मे-जून, १९९९